# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०५/०४/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. २८/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २८/०३/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री.किशोर पाटील** |
| २ | शासनाच्या प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच फेज-२ प्रकल्पांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना वेतनापोटी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरीता अनुदान मिळणेस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव :-** शासनाच्या प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम, आर.सी.एच. फेज-२ प्रकल्पाबाबत सविस्तर तथा परिपुर्ण माहिती पुढील मा. स्थायी समितीच्या बैठकीत घ्यावी. तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तुर्तास स्थागित ठेवावा अशी आजची सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री. सुनिल आचोळकर** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिका स्वच्छ भारत अभियानासाठी IEC (Information Education Communication) अंतर्गत शॉर्ट फिल्म व जिंगल तयार करणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरील विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावात नमुद कामांसाठी M/s Padmashri Productions Pvt.Ltd. ह्या संस्थेशी संविदा करणेस, त्यांच्याशी कामाचा करारनामा करणेस, कामाचा कार्यादेश देणेस व झ ालेल्या कामांचे देयके अदा करणेस आजची सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.किशोर पाटील सूचक :- मा.श्री.मिलिंद घरत** |
| ४ | वसई-विरार शहर महानगरपालिका पेल्हार कार्यक्षेत्रातील बाजार क्र. १) बिलालपाडा, धानिव, पेल्हार, गावराईपाडा, शिरसाड दैनंदिन बाजार व बाजार क्र. २) मांडवी आठवडे बाजार सन २०१६-१७ या वित्तीय वर्षाकरीता बाजार कर वसुली वार्षिक ठेका पद्धतीने देणेबाबत. | **ठराव :-** प्राप्त झालेल्या जादा दराची निविदाधारकाबरोबर संविदा करणेकरीता मा.स्थायी समितीची मंजूरी आवश्यक असल्याने व वित्तीय वर्ष ३१ मार्च २०१६ रोजी संपत असल्याने मा.स्थायी समितीची मंजूरी मिळेपर्यंत मागील वर्षातील मंजूर ठेकेदारास पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत दैनंदिन बाजार वसुली करणेंस ही सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. तसेच बाजार क्र.२ च्या फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या. तथापि सदरच्या निविदा स्पर्धात्मक नसल्याने फेर ई-निविदा जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करणे तसेच ई-निविदेची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत मागील वर्षातील मंजूर ठेकेदारास पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस तसेच बाजार क्र. २ ची फेर ई-निविदा मागविणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी ही सभा देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** |
| ५ | "दै. वसई समता" या वृत्तपत्राचे दर निश्चित करुन वसई विरार शहर महानगरपालिकेची जाहिरात देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त प्रस्तावात नमुदकामी मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. सबब प्रस्तावनेतील नमुद दराची तुलना करता **"दै. वसई समता"** या वृत्तपत्रात महानगरपालिकेच्या प्रकाशित करावयाच्या जाहीरातीसाठी रू. ०९/- प्रती कॉलम सें.मी. या दराने देयके अदा करण्यास वित्तीय मंजूरी प्रदान करण्यांत येत असून सदर कामी येणारा खर्च महिला बालकल्याण विभागाकडील तरतुदी मधून |

| | | |
|---|---|---|
| | | भागविण्यांत यावा असे आजची सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.मनिषा जाधव सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स** |
| ६ | प्रभाग समिती एफ धानिव / पेल्हार क्षेत्रातील विविध रस्त्यांवर लेन मार्क करणे व झेब्रा क्रॉसिंग मारणे कामाला प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी येणाऱ्या रू.१७,८७,३८८/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी विहीत प्रणालीनुसार पुढील कार्यवाही करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |
| ७ | प्रभाग समिती डी आचोळे क्षेत्रातील विविध रस्त्यांवर लेन मार्क करणे व झेब्रा क्रॉसिंग मारणे कामाला प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी येणाऱ्या रू.१७,८८,२५४/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी विहीत प्रणालीनुसार पुढील कार्यवाही करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री. समिर डबरे** |
| ८ | प्रभाग समिती एफ धानिव / पेल्हार क्षेत्रातील पेल्हार मुख्य रस्ता ते धानिव स्मशानभुमी पर्यंत संरक्षण भिंत बांधणे कामाला प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी येणाऱ्या रू.२१,३०,३२७/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी विहीत प्रणालीनुसार पुढील कार्यवाही करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समीर डबरे सूचक :- मा.श्री.किशोर पाटील** |
| ९ | प्रभाग समिती डी आचोळे क्षेत्रातील आचोळे कार्यालयातील प्राथमिक आरोग्य केंद्राची सुधारण करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणे. | **ठराव :-** सदर कामी येणाऱ्या रू.१४,७०,३५३/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीतुन सदरचे काम करणे व आवश्यकता लागल्यास जादाचा खर्च महापालिका निधीतुन करणेस ही सभा मंजूरी देत आहे. सदर कामी विहित प्रणालीनुसार निविदा मागविणेस तसेच याकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. मिलींद घरत** |
| १० | प्रभाग समिती एच कार्यक्षेत्रातील अंबाडी रोड पंचवटी हॉटेल समोरील चौक सुभोभिकरण करणेकामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मंजुरी देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त प्राप्त निविदांच्या दरांची तुलना केली असता मे. ओमकार कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेमधील सर्व बाबींचे दर कमी असल्याने त्यांच्या सोबत वाटाघाटी करून प्राप्त झालेल्या दरांना मुख्य लेखाअधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. ओमकार कन्स्ट्रक्शन यांच्याशी कामाची संविधा करण्यांस मान्यता देण्यांत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम मनिषा जाधव सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स** |
| ११ | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने / बगीचे देखभालीसाठी देण्याबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्याने/बगीचे, महिला बचत गट व नोंदणीकृत अशासकीय संस्था ह्यांना देखभालीसाठी देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच ह्या बाबत अर्ज मागवून योग्य त्या संस्था/बचत गट वैगरेशी आवश्यक तो करार व पुढील योग्य ती कार्यवाही करणेचे सर्व अधिकार मा. आयुक्तांना देणेत येत आहेत. तसेच ह्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा |

| | | |
|---|---|---|
| | | प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.समीर डबरे सूचक :- मा.श्री.किशोर पाटील** |
| १२ | विरार पूर्व/पश्चिम प्रभाग समिती सी व अे विभागीय बाजार शुल्क वसुली करणेकामी फेरनिविदा मागविणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त प्रस्तावानुसार साधक-बाधक चर्चा करण्यांत आली व फेर निविदा मागविण्यास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच मागील ठेकेदाराची मुदत दि. ३१/०३/२०१६ रोजी संपलेली असल्याने ई-निविदेची कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मागील वर्षातील मंजूर रक्कमेवर १०% वाढ करुन मंजूर ठेकेदारास पुढील ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ देणेस स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्रीम.कांता पाटील** |